दूरध्वनी : २८४१५७६/२०२६२४९ फॅक्स : २०२१३४८
ग्राम : पाणीमंडळ, मुंबई.

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन पॉईंट, मुंबई-२१.

क्र.मजीप्रा/सस/तांशा-१/521 दिनांक : १४ फेब्रुवारी,२००१

## परिपत्रक क्र. 53

**विषय :** मध्यवर्ती कार्यालयाकडे किंवा शासनाशी थेट पत्रव्यवहार न करणेबाबत.

असे निदर्शनास आले आहे की, काही क्षेत्रीय अधिकारी मध्यवर्ती कार्यालयास किंवा शासनाशी थेट पत्रव्यवहार करतात. तसेच काही प्रस्ताव देखील थेट मध्यवर्ती कार्यालयाकडे सादर केले जातात. वस्तुत: यंत्रणेचा एक भाग म्हणून प्रत्येक कनिष्ठ अधिकाऱ्याने कोणतेही प्रस्ताव लगेचच त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यामार्फतच सादर करणे गरजेचे असते ही प्रक्रिया बऱ्याच प्रकरणी विस्मरणांत गेलेली दिसते. उदा.कार्यकारी अभियंत्यांकडून/अधीक्षक अभियंत्यांकडून थेट सदस्य सचिव(तांत्रिक) यांच्याकडे पत्रव्यवहार केल्याचे आढळून येते.

या परिपत्रकाव्दारे सर्वांना निर्देशित करण्यात येते की, यापुढे अशा प्रकारचा थेट पत्रव्यवहार/प्रस्ताव मध्यवर्ती कार्यालयास किंवा शासनास कोणीही सादर करु नये. अर्थात ज्या प्रकरणी क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडून शासनानेच क्रिंवा मध्यवर्ती कार्यालयाने थेट अहवाल मागविला आहे अशा प्रक-रणी तसेच विधानपरिषद/विधानसभा, लोकसभा प्रश्नांच्याबाबत मागविलेल्या माहितीचा अपवाद या ठिकाणी करण्यात यावा.

वरील सूचनांची सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी तसेच कार्यालयातील संबंधितांनी नोंद घ्यावी.

(सुरेश साळवी)
सदस्य सचिव

प्रत :
सदस्य सचिव(तांत्रिक),म.जी.प्रा.,मुंबई
विशेष कार्य अधिकारी व मुख्य अभियंता,म.जी.प्रा.,नवी मुंबई
मुख्य प्रशासकीय अधिकारी,म.जी.प्रा.,मुंबई
वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी,म.जी.प्रा.,नवी मुंबई
मुख्य अभियंता(सर्व),म.जी.प्रा.
अधीक्षक अभियंता,समन्वय/गुण परिक्षण पथक/मुख्यालय/म.नि.सं.व सं.कक्ष,
अधीक्षक अभियंता(सर्व),म.जी.प्रा.मंडळ
कार्यकारी अभियंता(सर्व),म.जी.प्रा.बांधकाम विभाग
उप मुख्य लेखा अधिकारी,१/२/३,म.जी.प्रा.,नवी मुंबई
कायदा व कामगार अधिकारी,म.जी.प्रा.,नवी मुंबई